International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.12 No.4 March – April 2025

महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकारण 2004 ते 2019 : एक अभ्यास

ऋतुराज किशोर माने

संशोधक विद्यार्थी,

राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

Corresponding Author - ऋतुराज किशोर माने

DOI - 10.5281/zenodo.15639558

सारांश :

01 मे 1960 साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन व लोक चळवळीतून 106 हुतात्मा झाले. मुंबईसह मराठी भाषकांचे राज्य प्रत्यक्ष निर्माण होण्यास 1940 ते 1960 या कालावधीत हजारो लोकांचे योगदान व त्याग आहे. महाराष्ट्र राज्याला एक गौरवशाली व कर्तृत्व संपन्न वारसा लाभला आहे. महाराष्ट्र राज्य ही औद्योगिक, आर्थिक व सांस्कृतिक अंगाने ही प्रगत व पुढारलेले मानले जाते. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर प्रारंभीच्या काही दशकावर महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक जीवनावर संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील विचार, दृष्टी व धोरणांचा मोठा प्रभाव होता. समाजवादी डाव्या व सर्वोदय विचारांचा प्रभाव असण्याचा तो काळ होय. एक मे 1962 साली महाराष्ट्रात पंचायत राज्याची सुरुवात झाली. महाराष्ट्राची विधिमंडळ सुरुवातीपासून द्विगृही होती. ब्रिटिश भारतात मुंबई प्रांतातील राजकीय नेतृत्व संघटना या राष्ट्रीय काँग्रेसच्या विचारधारेच्या होत्या. गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता, लोकमान्य टिळक, के.टी. तेलंग, तयबुद्दीन तय्यबजी, महात्मा गांधी, न्यायमूर्ती म.गो. रानडे, विठ्ठल पटेल, दादाभाई नौरोजी, यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई, स. का. पाटील, प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी, इत्यादी सर्व नेतृत्व मुंबई प्रांतात दबदबा व प्रभाव टिकवून होते.

महाराष्ट्राचे राजकारण हे सातत्याने पुरोगामी, परिवर्तनकारी प्रबोधनाचे केंद्र राहिले आहे. शिव - शाहू, फुले - आंबेडकर - शिंदे यांचा वारसा संवर्धित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 1970 व 1990 च्या दशकानंतर महाराष्ट्रात राजकीय समीकरणे व स्वरूप बदलत गेले.

प्रस्तुत शोधनिबंध हा महाराष्ट्राच्या आघाडीच्या व नेत्यांच्या राजकारणावर आधारित आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा 2004 ते 2019 पर्यंतच्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील नवी युती व समीकरणांचा आढावा घेणारा आहे. महाराष्ट्र राज्याचे राजकारण देशाला दिशा व वळण देणारे असते.

प्रमुख शोध शब्द: आघाडी, युती, राजकीय कृतीकार्यक्रम, राजकीय अपरिहार्यता, राजकीय तडजोडी, किमान समान कार्यक्रम, किमान मागण्या.

प्रस्तावना:

महाराष्ट्र निर्मितीनंतरच्या प्रारंभीच्या दशकात राष्ट्रीय काँग्रेस समाजवादी पक्ष प्रजा समाजवादी पक्ष शेतकरी कामगार पक्ष जनता दल भाग माकप या पक्षांचा प्रभाव व जनाधार होता. महाराष्ट्राच्या विधानसभेत ग्रामीण व कृषी प्रधान संस्कृतीतील नेतृत्व उदयास येत होते. महाराष्ट्रात पंचायत राज मधून नवीन नेतृत्व तयार होत होते. शेकापची स्थापना झालेली होती. जून 1966 साली शिवसेना पक्षाची स्थापना झालेली होती. 1980 च्या दशकात शेतकरी संघटना व तिचे शरद जोशी सारखे नेतृत्व उदयास आले. 1980 साली जनसंघाचे रूपांतर भारतीय जनता पार्टीत झाले. मूळ राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून कुठून 1999 साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाच्या एक हाती वर्चस्वाला शह मिळत गेला. महाराष्ट्रात 2004 साली महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा प्रादेशिक पक्ष निर्माण झाला. स्वाभिमानी शेतकरी संघटना निर्माण झाली. प्रहार, जनसुराज्य, मविआ, वंचित आघाडी, रिडालोस, स्वराज्य असे प्रादेशिक स्वरूपातील पक्ष निर्माण झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा व वळण मिळत गेले. महाराष्ट्राला एका विशिष्टच पक्षाला बहुमत प्राप्त पुणे कठीण होत गेले. यातून महाराष्ट्रात 1995 नंतर आघाडी व युती आकारास येऊ लागली. राजकारणामध्ये कोणीही स्थायी व अस्थायी स्वरूपाचा मित्र किंवा शत्रू असू शकत नाही. राजकीय क्षेत्रात राजकीय पक्षांचा सत्ता संपादन किंवा सत्ता टिकवणे हा एकमेव अंतिम उद्देश असतो. यातून राजकीय पक्षांची प्रचंड चढा-ओढ व चुरस असते. राजकीय संस्कृती, राजकीय कृतीकार्यक्रम, राजकीय, सामाजिक, वितरण, राजकीय सत्ता, राजकीय प्रक्रिया या बाबी महाराष्ट्राच्या राजकारणासंदर्भात बदलत गेल्या. राजकीय क्षेत्र अनिश्चित व अनैतिक स्वरूपाचे बनत चालले. महाराष्ट्रात सन 2000 नंतर कोणत्याही एका विशिष्ट पक्षांचे सरकार /शासन बनू शकले नाही. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील मागील दोन दशकातील राजकीय सिद्धांतराचा वाहतो करण्यात आला आहे. यासाठी संकलित माहिती व संदर्भ पुस्तकांचा वापर करण्यात आला.

उद्दिष्टे:

1. महाराष्ट्र आणि राजकीय संस्कृतीचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील आघाडी व ईतींचा अभ्यास करणे.
3. महाराष्ट्राच्या राजकारणावरील आघाडी राजकारणाचा अभ्यास करणे.
4. 2004 ते 2019 या दोन दशकातील नेतृत्व व निवडणुकांचा अभ्यास करणे.

विषय विवेचन:

2004 साली महाराष्ट्रात भाजप - शिवसेना पक्षाचे युतीचा पराभव करत काँग्रेस राष्ट्रवादीचे

आघाडी सरकार सत्तेवर आले. 1999 साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन झाला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील हा पक्ष महाराष्ट्रात जनाधार टिकून आहे. जागतिकीकरण व 21 व्या शतकातील पहिले दशक ही आघाड्यांचे राजकारणाचा पाया घालणारे होते. महाराष्ट्रात काँग्रेस हाय कमांड संस्कृती व दिल्लीतून नेतृत्व बदल हे सूत्र तयार झालेले होते. 2014 नंतर महाराष्ट्रात भाजपा हा सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून उदयास आला.

2004 ते 2014 या कालावधीत महाराष्ट्रात विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, आर. आर. पाटील, छगन भुजबळ, नारायण राणे, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, अजित पवार, विखे पाटील, हर्षवर्धन पाटील, सुप्रिया सुळे, सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे हे नेतृत्व आघाडीच्या राजकारणात केंद्रस्थानी होते. 2004 व 2009 च्या विधानसभा निवडणुकीत या नेतृत्वाने उत्तम यश संपादन केले.

धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, महिला सबलीकरण, बांधकाम, सिंचन, रस्ते, उच्च शिक्षण, व्यापार, दलित - अल्पसंख्यांक कल्याण हा प्रमुख राजकीय कृतीकार्यक्रम होता.

महाराष्ट्रात 2009 साली मनसे पक्षांनी 13 जागा जिंकत शिवसेना-भाजप युतीचे नुकसान केले. त्याचा फायदा पुन्हा एकदा आघाडी सरकारला झाला. 2009 साली महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यात युतीला यश मिळाले. परंतु विदर्भ, खानदेश, उत्तर महाराष्ट्रात आघाडीला उत्तम यश मिळाले नाही.

2004 ते 2014 या कालावधीत केंद्रात UPA-I, II कार्यरत असल्याने महाराष्ट्रातील आघाडी पक्षांच्या राजकारणाला विशेषत: काँग्रेस पक्षाला त्याचा फायदा होत गेला. यामध्ये महाराष्ट्रातून अनेक दिग्गज काँग्रेस नेते केंद्रीय मंत्री झाले. महाराष्ट्रात 1990 नंतर मोठ्या प्रमाणावर बहुपक्षीय राजकारणाला सुरुवात झाली. आघाडी - युती ही महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या राजकीय संस्कृती व राजकीय घडामोडी ला जन्म देणारी अपरिहार्यता आहे.

निष्कर्ष:

2004 ते 2014 या कालावधीत महाराष्ट्रात एकनाथ खडसे, देवेंद्र फडणवीस, गोपीनाथ मुंडे, चंद्रकांत पाटील, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, विनोद तावडे, पंकजा मुंडे, रामदास कदम, दिवाकर रावते हे नेतृत्व युतीचा जनाधार वाढवण्यासाठी झटत होते. 2014 नंतर केंद्रातील सत्ता बदल झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी झाल्यानंतर महाराष्ट्रात त्याचा मोठा फायदा भाजप या पक्षाला मिळाला.

महाराष्ट्राच्या राजकारणावर उद्योगपती खेळाडू अभिनेते कलाकार दूध- शिक्षण - सहकार सम्राटांचा वावर व प्रभाव वाढत गेला. महाराष्ट्राचे राजकारण हे मोठ्या शहराभोवती व भांडवलाभोवती फिरू लागले. शहरीकरण व नागरिकीकरणातून शहरी, स्थानिक स्वराज्य

संस्थातून नवीन नेतृत्व तयार झाले. महाराष्ट्राच्या राजकारणावर सहकार, ग्रामीण, सर्वोदय विचारांच्या नेतृत्वाअभावी नवे शहरी व नागरी समाजातील नेतृत्व तयार झाले. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, समाजवादी, डावे, शेकाप मधील जुने व अनुभवी नेतृत्व निष्प्रभ होत चालले आहे.

1978 साली विधानसभा निवडणुकीत कोणत्याच राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने रेड्डी काँग्रेस व इंदिरा काँग्रेस येऊन एकत्र येऊन श्री वसंतदादा पाटील यांचे पहिले आघाडी सरकार सत्तेवर आले होते. परंतु ही आघाडी सरकार अल्पजीवी ठरले. 1995 साली शिवसेना-भाजपा युतीला 132 जागा मिळाल्या. अपक्षांचा पाठिंबा घेऊन मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली युतीचे सरकार स्थापन झाले. 1999 साली आघाडीला 133 विधानसभा जागा मिळाल्या. अपक्षांच्या सहकार्याने मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे लोकशाही आघाडी सरकार स्थापन केले. 2004 साली पुन्हा आघाडीने 146 जागाच मिळवत सत्ता स्थापन केली. 2009 साली आघाडीला 144 जागा तर अन्य अपक्ष 26 एकत्र येऊन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे सरकार स्थापन झाले. 2014 साली भाजप 122 तर शिवसेनेला 63 जागा मिळून युतीचे सरकार स्थापन झाले. 2019 साली भाजप 105, शिवसेना 56, काँग्रेस 44, राष्ट्रवादी 54 जागा मिळाल्या होत्या. यादरम्यान विविध नाट्यमय घडामोडी नंतर ज्येष्ठ नेते सर आज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडी स्थापन झाली व मुख्यमंत्री पद हे श्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सोपवले. अशा रीतीने महाराष्ट्राच्या गेल्या 40-45 वर्षाच्या राजकारणात आघाडी (संयुक्त) सरकारची पद्धत स्वीकारलेली दिसते. आघाडी व इथे संपूर्ण भारताच्या राजकारणाची अपरिहार्यता दिसत आहे. अभ्यासक, विश्लेषक, जाणकार, पत्रकार, राजकीय नेतृत्व व साहित्य क्षेत्रातील दिग्गज हे सत्य स्वीकारतात. कारण केरळ, पश्चिम बंगाल, ओडीसा, पंजाब, दिल्ली, गुजरात, हरियाणा या राज्यात एक पक्षीय राजवट स्थापन होते. उदा. तृणमूल काँग्रेस, बिजू जनता दल परंतु महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक, काश्मीर, आसाम, झारखंड, छत्तीसगड, आंध्र, तेलंगणा या राज्यात राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्षांची युती/आघाडी दिसून येते.

शिफारशी:

महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर युती - आघाडी राजकारणात सत्ता- संपत्ती व पक्षवर्चस्व केंद्रस्थानी असू नये. महाराष्ट्राच्या जिल्ह्यात घराणेशाही चे नवे प्रारूप निर्माण होत आहे. या विशिष्ट पक्षांच्या मक्तेदारीला मतदारांनी आळा घालायला हवा.

महाराष्ट्रात विधिमंडळामध्ये जनाधार असलेली व अभ्यासू संसद पटू तयार व्हावेत ज्यायोगे विधिमंडळ अधिवेशन सुरळीत व फलदायी होतील.

महाराष्ट्राच्या महामयीम राज्यपालांनी संसदीय संकेत, प्रथा व प्रतिष्ठा जपावी. राज्यपालांनी तटस्थनीपक्ष राहावे. पक्षीय भूमिका व हितसंबंध जोपासू नयेत, कारण राज्यपाल हे प्रति मुख्यमंत्री

झाल्यास त्यांचा सर्वाधिक फटका हा लोकनियुक्त सरकारला बसतो.

राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य ही विधान क्षेत्रातील तज्ञ, जाणकार व कर्तबगार लोक असावेत. यामध्ये पक्षीय पुनर्वसन पायला नको. विधान परिषद सभागृहाची गरिमा व लौकिक जपायला हवी.

पक्षांतर बंदी कायद्याची कठोर अंमलबजावणी गरजेचे आहे. घाऊक पक्षांतर व पक्ष फुट थांबायला हवी. संविधानातील घटनात्मक नीतिमत्ता, तत्त्वांचे पालन व्हायला हवे. सहकारी व स्पर्धात्मक संघराज्यवादाचे पालन व्हायला हवे.

संदर्भ :

1. महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर - तुकाराम जाधव, विवेक घोटाळे, युनिक प्रकाशन, 2014.
2. महाराष्ट्राचे राजकारण व शासन (1960 - 2020), एस. एस. गाठाळ, युवराज प्रकाशन, 2022.
3. महाराष्ट्राचे राजकारण नवे संदर्भ - विजय चोरमारे, नवमा प्रकाशन.